IJARSCT

International Journal of Advanced Research in Science, Communication and Technology

International Open-Access, Double-Blind, Peer-Reviewed, Refereed, Multidisciplinary Online Journal

ISSN: 2581-9429

Volume 5, Issue 11, March 2025

Impact Factor: 7.67

# पाश्च्यात्य वसाहतवाद ते भारतीय आर्थिक राष्ट्रवादाची निर्मिती एक अवलोकन

डॉ. भारत शांताराम खराडे

दोशी वकील आर्ट्स कॉलेज अँड

जी. सी.यु.बी. सायन्स अँड कॉमर्स कॉलेज, गोरेगांव - रायगड

**गोषवारा किंवा सारांश:**

प्राचीन ते आधुनिक युगाच्या दरम्यान भारत भूमीतील मानवानी विविध स्थित्यतरंचा अनुभव घेतला आहे आणि आज ही आपण तो घेत आहोत. ग्रीकांच्या आक्रमणा पासून ते भारताला स्वातंत्र्य मिळे पर्यंत आलेल्या आक्रमकांनी भारताची लुट केलेली आढळते. यात येणारे व्यापारी, धर्मोपदेशक किंवा प्रशासक या सगळ्यांचा उद्देश भारताची लुट हाच होता. याकरता मध्ये काही टप्प्यांचा विचार उदा. व्यापारवाद, मुक्त व्यापार, वित्त साम्राज्यवाद इ. सर्वांचा परिणाम हा भारतीय व्यापार आणि अर्थ व्यवस्थेवर झालेला आढळतो. ब्रिटीश शासन आणि त्यांच्या विरोधी कार्य पद्धतींच्या सरावा मुळे निर्माण होणाऱ्या समस्यांचा विचार करणे हा मुख्य उद्देश आहे.

भारतीय सामाजीक, आर्थिक, राजकीय आणि सांस्कृतिक घटक यास जबाबदार आहेत. उपरोक्त निर्देशित केलेल्या टप्प्यांचा विचार करता भातीय भांडवलावर ब्रिटीश एजन्सीज नियंत्रण ठेवत होते. त्याच बरोबर परदेशी व्यापार कंपन्या आणि व्यवस्थापन हे ही कालांतरानी त्यांच्या क्षेत्रातील मुख्य घटक बनला. त्याचा परिणाम भातीय अर्थव्यवस्था आणि पर्यायानी साम्राज्य विकासात झाले. एकीकडे स्वदेशी हस्तकला दारिद्र्याचा सामना करत असताना, दुसरीकडे, वसाहतीत आधुनिक उद्योग विकसित करण्याचे फार कमी प्रयत्न झाले. तरीही वसाहतवादी सरकार केलेले बद्दल 'मोफत' व्यापार', स्वदेशी उद्योग यांनी अनेकांना तोंड दिले अडथळते कायमधारा बंदोबस्त या मुळे आलेला बदल असेल किंवा ब्रिटिशानी सुरुवातीच्या काळात आणलेले उद्योग उदा. रेल्वे, ज्यूट उद्योग, चहाचे मळे आणि खाणकाम यामुळे आलेल्या बदलांचा विचार केला जाईल.

पाश्च्यात्य विचारांच्या परिणामांच्या विचार करता भारतीय स्वयंपूर्ण असणारी अर्थव्यवस्था आणि ब्रिटीश शासना अंतर्गत असणारी किंवा निर्माण झालेली परिस्थिती यांचे आवलोकन करता परकीय व्यापार्यांनी भारताची लुट करण्याचा जो मार्ग अवलंबला त्याचा उहापोह करण्याचा प्रयत्न केला जाणार आहे.